


ऑक्टोबर १९६८





नजीक नेपाळी सैन्याचा पराभव केला (१८१६ फेब्रुवारी २८). त्यानंतर कांहीं दिवसांनी तह्याला मान्यता दिली.

ह्या संधीमुळे नेपाळी राज्यातला दक्षिणी सरहद्दीजवळचा सुपीक प्रदेश नेपाळसत्तेत राहाला नाही. गढवाल व कमाऊचे जिल्हे ब्रिटीश कंपनीला द्यावे लागले. सिक्किम-मधून सत्ता काढून घेतली व काठमांडू येथे ब्रिटीश रेसिडेंटला ठेवणे मान्य केले.

या संधीचा इंग्रजांना फार फायदा झाला. त्यांच्या राज्याची सरहद्द पश्चिमोत्तर डोंगराळ प्रदेशाला जाऊन भिडली. सिमला, मसूरी, अल्मोडा, नैनीतालसारखी पर्वतीय नगरे त्याना मिळाली.

१० फेब्रुवारी १८१७ या रोजी इंग्रजांनी सिक्किमच्या राजाशी एक तह करून घेतला. या तहाप्रमाणे नेपाळच्या राजाकडून मिळालेला प्रदेश इंग्रजांनी सिक्किमच्या राजाला दिला. याचा फायदा हा झाला की नेपाळ व भूतान या दोन्ही राज्यांमधल्या प्रदेशावर इंग्रजांना एक दोस्त राज्य मिळाले.

अशातऱ्हेने देशातली संस्थाने एकेक करून इंग्रजांच्या छत्राखाली येऊ लागली. हिंदुस्थान मध्यवर्ती प्रदेशातले पेंढारी व पठाण स्वाऱ्या करून अराजकता पसरवीत होते. राजपुतान्यात आपसातली भांडणे वाढत गेली.

पेंढाऱ्यांनी १८१५-१६ मध्ये निजामचे उत्तरी सरकारच्या राज्यात लुटालूट सुरू केली. वॉरन हेस्टिंग्स याने पेंढाऱ्यांची सुळसुळाट बंद पाडण्यासाठी एक योजना तयार केली आणि १८१८ जानेवारीपर्यंत त्यांचा पूर्ण विमोड केला. पेंढाऱ्यांसारखेच पठाणपण लुटालूट करीत होते. परंतु त्यांच्यावर आपला अंकुश रहावा म्हणून त्यांच्या नायकाला वळवून घेऊन त्याला एक छोटे राज्य देऊ केले.





डाव उलटला


एका गावी सोन्याबापू नावाचे गरीब गृहस्थ रहात असत. उदरनिर्वाहाचा काही मार्ग दिसला नाही तेव्हां त्यांनी रामपुरी प्रस्थान केले. त्या गांवच्या लोकांचा देवावर फार विश्वास होता. त्या गावी सोन्याबापू वेष पालटून संतभक्तासारखे राहू लागले. गांवकऱ्यांनी सोन्याबापूची भक्ति पाहिली व त्यांच्या मनात सोन्याबापू विषयी आदर वाढत गेला.

हळूहळू गावच्या देवळाची सर्व व्यवस्था गावकऱ्यांनी सोन्याबापूंच्या हाती दिली. ते गावकऱ्यांकडून फंड गोळा करीत व देवाचा कोणता तरी उत्सव दर आठवड्याला काढीत. अशातऱ्हेने सोन्याबापूंचे बस्तान छान बसले. पोटापाण्याची चिंता उरली नाही.

हळूहळू सोन्याबापूंच्या मनात पैशाचा लोभ वाढू लागला. हळूहळू पैसा गोळा करू लागले. त्यांनीं शिवरात्रि उत्सवाची तयारी सुरू केली.

शिवरात्रीच्या आधी एकदा सोन्याबापूंनी गावकऱ्यांना देवळाच्या आवारात एकत्र करून विनंती केली–"भक्त हो! उद्यांपरवां शिवरात्र येते आहे. या शिवरात्रीला लक्षदीपोत्सव व्हावयाला हवा. रात्रभर लक्षदीप तेवत राहाले पाहिजेत. त्याच बरोबर भजन कीर्तनाची व्यवस्था पण करावी लागणार. ब्रह्मभोज देखील शेवटी झाला पाहिजे. आपल्या गावाचे नांव तीर्थ-क्षेत्र म्हणून जगभर प्रसिद्ध झाले पाहिजे."

सोन्याबापूंचा ठराव सर्व गावकऱ्यांना पसंत पडला. त्यांनी जवळपासच्या गावकऱ्यांकडून पण वर्गणी वसूल केली आणि शिवरात्री उत्सवाला हजर राहण्याची विनंती केली.



एका जत्रेचे रूप आले शिवरात्रि उत्सवाला. पहाटे पासून पूजा, पाठ, भजन, कीर्तनादिकास सुरवात झाली.

सोन्याबापूंना लोक शंकराचा आवतार मानू लागले. स्वत: गोपाळपण तेच मानू लागला होता. त्या दिवशी गोपाळ आला तेव्हां त्याला एका बाजूला नेऊन सोन्याबापू म्हणाले–"हे पहा गोपाळराव! आज देव तुमच्या अंगात येणार आहे. म्हणजे तुम्ही तसे नटले तरी पाहिजेच व देवाच्या तोंडचे शब्द म्हणून तुम्ही सांगावे की आजचा उत्सव संपल्यावर जी रक्कम उरेल ती माझ्या नावे गांवकऱ्यांनी लिहून द्यावी. कारण कोणाला कशी दुर्बुद्धी होईल कोणास ठाऊक?"

गोपाळच्या मनात सोन्याबापूंविषयी जो आदर होता तो पार लयास गेला. देवाच्या नावाने वसूल केलेले धन स्वत:च्या नावी लिहून टाकायला सांगतो आहे, लबाड! आज याची खोड मोडलीच पाहिजे.


रात्री लक्षदीप लावण्यात आले. सर्व देऊळ त्या ज्योतीच्या प्रकाशात सुंदर दिसत होते. कीर्तन चालू होते. भजन चालू असता सोन्याबापू व गोपाळ पण भजनांत निमग्न झाले.

तेवढ्यात सोन्याबापूंनी डोळ्याने खूण केली. लगेच गोपाळ जोराने ओरडला. भजन एकाएकी थांबले. गोपाळ शिवतांडव नृत्य करू लागला. सर्व ते दृश्य पाहून घाबरून गेले. पण सोन्याबापूंनी सर्वांना शांत केले व म्हणाले–"हे पहा, गोपाळच्या अंगात देव आला आहे. काल रात्री मला दृष्टांत झाला. देव म्हणाला, मी कोणत्यातरी रूपात प्रगट होणार आहे आणि देव अंतर्धान पावला. तो दृष्टांत यथार्थ झाला. शंकराला आपल्या पैकी कोणामध्ये काही दोष दिसला असावा."

नंतर सोन्याबापू गोपाळकडे वळून त्याला विचारू लागले–"प्रभो! आपल्या भक्ताच्या हातून काही अपराध घडला आहे का? आपल्या आज्ञेचे आम्ही डोळे झांकून अक्षरश: पालन करू."

गोपाळ बोलू लागला–"हे स्वामिद्रोही! मी स्वप्नात तुला आज्ञा केली होती. पण या पापाच्या खड्ड्यातून बाहेर यायची तुझी इच्छा दिसत नाही. या सर्व भक्तांच्या समोर सत्य लपवून ठेवून मला राग यायला कारण झाला आहेस. आज पावेतो तू माझी सेवा करून पुष्कळ पुण्य मिळविले आहेस. आज माझ्या अदृश्य देहांत तुझा पंचभूतांचा हा देह लीन होण्यास उत्तम मुहूर्त आहे. तुला मी स्वप्नात सांगितले त्याप्रमाणे तू सजीव समाधी घे. तू आज्ञा भंग केली आहेस." असे सांगून गोपाळ बेशुद्ध स्थितीत जमिनीवर पडला.

काही वेळाने त्याला शुद्ध आली. तो पर्यंत सर्व भक्त सोन्याबापूला घोळका करून विचारू लागले–"काय हो, हे सर्व तुम्ही कां नाही आम्हांला सांगितलेत? देवाची आज्ञा मोडलीत! त्याचे फळ तुम्हांला मिळेल ते मिळेल, आम्हां गावकऱ्यांना पण



देवाचा कोप सहन करावा लागेल. तुमच्या सारखा भाग्यवान कोण असणार? स्वत: देवाने तुम्हांला प्रेमाने बोलाविले आहे. तेव्हां आम्ही तुमचे अभिनंदन करतो."

नंतर काही गावकऱ्यांनी एक खड्डा खणला. सोन्याबापूंचे हातपाय कापू लागले. गोपाळने त्यांना फसविले होते. म्हणून एका बाजूला राग तर दुसऱ्या बाजूला प्राणभय. ते थरथर कापू लागले. तेवढ्यांत एक जण येऊन म्हणाला–"यावे! समाधीप्रवेशाची तयारी झाली आहे."

पण सोन्याबापू म्हणाले–"मी हाती घेतलेले काम पुरे करून समाधी घेणार



आहे. घाई कसली? मी गेल्यावर या गावावर मोठ मोठे प्रसंग येतील. म्हणून मला काही तजवीज केली पाहिजे."

गावकऱ्यांना सोन्याबापूंच्या बोलण्याचा राग आला. म्हणाले–"तू कसला भक्त रे! देवाने स्वत: बोलाविले व तू पाय मागे घेतोस? देवाने आपला तिसरा डोळा उघडला तर तुझ्याबरोबर आम्ही सुद्धा भस्म होऊन जाऊ. आम्ही तुझे एक देखील ऐकणार नाही."

सोन्याबापूंच्या अर्वांगाला घाम सुटला. ते सर्व पहात असता गोपाळचे पाय धरून म्हणाले–"गोपाळ! तूंच वांचविलेस तर हा जीव वाचणार?"

सोन्याबापूंनी गोपाळचे पाय कां धरले, लोकांना कळेना. तेव्हां गोपाळ म्हणाला– मी खरी गोष्ट सांगतो ती ऐका! सोन्याबापू आपल्या गावी पोटापाण्यासाठी भक्ताचे सोंग करून आले. आपण त्यांचे सत्य रूप ओळखले नाही. त्यांनी धनलोभाने पैसे जमा करण्याचा उद्योग सुरू केला. त्या-साठीच त्यांनी निरनिराळे उत्सव योजले. शिवरात्रीचा उत्सव त्यासाठीच होता. त्यांनी मला देव अंगात येण्याचे सोंग करायला सांगून देवाचे सर्व धन आपल्या नांवी लिहून देण्यास सांगावे असे सांगून ठेवले होते. हे सर्व मी आधी सांगितले असते तर तुमचा माझ्या बोलण्यावर विश्वासच बसला नसता. पण आतां सर्व वस्तुस्थिती उघड झाली आहे."

सोन्याबापूनी गोपाळ जे म्हणाला ते सर्व खरे असल्याचे कबूल केले. ज्या गृहस्थाचा सर्वांनी इतके दिवस आदर केला त्याला शिक्षा करण्याचा विचार कोणाच्या मनाला शिवला नाही. परंतु सोन्याबापू स्वत:च गांव सोडून निघून गेले.





रूप घेतले आहे. त्याला याच रूपात पकडून ठार करून जाळून टाकूया."

पडक्या देवळाच्या पुजाऱ्याच्या अपूर्व चातुर्याच्या गोष्टीवर शिखीमुखला विश्वास बसला होता. तो अस्वलाचे रूप घेऊन पळत असल्यास नवल नाही. नागजातीचा विश्वास त्याच्या अपूर्व शक्तीवर आहे. म्हणून हे भोळे भाबडे नाग अस्वलाला पाहून अस्वलाच्या रूपात पुजारीच असल्याचे समजून फसल्यास नवल नाही.

असे समजून शिखीमुखने आपल्या लाल कुत्र्याला 'छू' करून अस्वलावर सोडले आणि म्हणाला–"विक्रम! तुम्ही सर्व जण जाऊन त्या अस्वलाला पकडा. लट्ठूसिहाच्या अनुयायांनी सांगितल्याप्रमाणे अस्वलाच्या रूपांत तो पुजारी असू शकेल. असो किंवा नसो, निदान आतां तरी त्यांना राग येईल असे वागून भागणार नाही. मी तिकडे, तो गुहेत लपून बसलेला तर नाही, ह्याची खात्री करून घेतो." असे सांगून शिखीमुख गुहेत शिरला.


गुहेचा काना कोपरा लक्षपूर्वक पाहाल्या-नंतर शिखीमुखला काही खुणा दिसल्या. त्यांवरून पुजारी त्या गुहेत काही दिवस का होईना, राहाला असेल, या गोष्टीचा त्याला संशय राहाला नाही. गुहेच्या एका कोपऱ्यात वाघाचे कातडे अंथरलेले होते. दुसऱ्या कोपऱ्यात काही भांडी व चुली दिसल्या. चुलींच्या बाजूला दोन मशाली तेलात भिजवलेल्या दिसल्या.

शिखीमुखने प्रत्येक भिंत व जमीन ठोकून वाजवून खातरी करून घेतली की पळून जायला कोठून चोर वाट तर नाही. तो पुष्कळ आधी निघून गेला होता व फार चातुर्याने त्याने गुहेच्या तोंडावर अस्वलाचा उपयोग केला होता.

पडक्या देवळाच्या पुजाऱ्याच्या चातुर्याचे शिखीमुख कौतुक करीत उभा असता त्याला एकाएकी विक्रमकेसरीची आरोळी ऐकू आली. तो लगेच गुहेबाहेर आला. अस्वलाला उंच खडकांच्या कोंडीत कोंडून नागलोक त्याच्या गळयात दोरीचा फांस घालण्याच्या प्रयत्नात होते. लाल कुत्रा त्या खडकांमधून पळून जायला जो पळवाट होती तिच्या तोंडाशी पलीकडच्या बाजूने भुंकत होता. अस्वलाला पळून जाणे अशक्य होते.


विक्रमकेसरी शिखीमुख जवळ येऊन हळूच म्हणाला–"शिखी! हे काळे अस्वल आहे, पुजारी नाही, हे मला नक्की कळत आहे. परंतु या मूर्ख नागलोकांच्या बोलण्या-वर विश्वास केला नाही तर आपण विनाकारण यांना दुखविल्या सारखे होईल. ही गोष्ट हे लोक आपला नायक लट्ठूसिंह याला सांगितल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणतील–"आम्ही सर्व माहीत असून ही जाणून बुजून अस्वलाच्या वेषांतल्या पुजाऱ्याला सोडले. पुजाऱ्याच्या मंत्रातंत्रावर लट्ठूसिहाचा पूर्ण विश्वास आहे, हे पण आपणां सर्वांना माहीत आहे."

"पण मला तसे वाटत नाही. पुजाऱ्या-मुळे लट्ठूसिंह संकटात सांपडला. तेव्हां पासून पुजाऱ्यावरचा त्याचा विश्वास



उडाला आहे. उलट तो पुजाऱ्याचा तो द्वेष व घृणा करू लागला आहे. ते काही असो, डोंगराखाली पाहारा देणाऱ्यांना पुजारी या गुहेतून निघून गेल्याची गोष्ट नक्कीच माहीत नसणार. आणि हे अस्वल या गुहेत रहात आहे. याला धरून घेऊन जाऊन लट्ठूसिंह व बाबांना आपण दाखवू या. नंतर आपण पुजाऱ्याचा शोध काढू." शिखीमुख म्हणाला.

शिखीमुखने उंच खडकावर चढून अस्वला-कडे न्याहाळून पाहिले. ते डोळे वटारून लोकांना भेडसावीत पळून जाण्याच्या तयारीत होते.



शिखीमुखने एकदा चहूकडे दृष्टी फिरविली. दूर झाडीत झाडांवर जंगली वेली लोंबत होत्या. त्या ओढून त्यांची दोरी वळून दोरीचा फास अस्वलाच्या गळ्यांत टाकून ओढला. तो फास, अस्वल त्यात जास्त अडकत जाईल अशा बेताने ओढण्यात आला. अस्वल दोरी दोन्ही हातांनी धरून ती तोडू लागले. शिखीमुखने सर्वांना सावध करून दोघातिघां नागलोकांना वर खडकावर पाठवून दोरी वर ओढायला सांगितले. त्यामुळे अस्वल जमिनीवरून एक दोन फूट वर उचलले गेले. शिखीमुखने ते असहाय अवस्थेत असतांना त्याच्या तोंडांत एक दोर टाकून तो दोर जोराने आवळला. त्यानंतर अस्वलाला हालता डुलता येईना.

शिखीमुख व विक्रमकेसरीने त्या अस्वलाला शिताफीने खडकांच्या कोंडीतून बाहेर काढले. नंतर दोरखंडे नागलोकांच्या हातात देऊन म्हणाले—"चला आतां शबरांच्या वस्तीकडे. तुमचा नायकच सांगेल की हा पुजारी आहे की हे अस्वल आहे."

अस्वलाला घेऊन सर्व शबरांच्या वस्तीपर्यंत आले. तेव्हां गांवातल्या बायका व मुले 'पुजारी अस्वल' 'पुजारी अस्वल' असे ओरडत त्याच्या मागून येऊ लागले. जिवाजी व लट्ठूसिंह गांवाच्या वाड्यात बसले होते.


जिवाजीला बाहेर गडबड ऐकू आली तेव्हां त्याने बाहेर येऊन पाहिले. शिखीमुखला व अस्वलाला पाहून त्याने विचारले—"हे काय घेऊन आला आहेस? तो बदमाश पुजारी गुहेत नव्हता का?"


"पुजारी गुहेतून केव्हांच पळून गेला. ही गोष्ट पाहारेकऱ्यांना कळू नये म्हणून त्याने गुहेत या अस्वलाला बांधून ठेवले होते." शिखीमुखने आपल्या समजुतीप्रमाणे जिवाजीला सांगितले. थोडा वेळ विचार करून तो पुन्हा आपल्या बापाला म्हणाला—

"लट्ठूसिहाच्या अनुयायांना वाटते आहे की हे अस्वलच पुजारी आहे. म्हणून याला पकडून आणले आहे. तेव्हां लट्ठूसिहाने एकदां या अस्वलाला पाहून घेतले तर बरे होणार आहे. त्याने सांगितले तरच त्याच्या नाग अनुयायांना हे अस्वल आहे की पुजारी हे कळेल."

त्याच वेळी लट्ठूसिहाचे दोन अनुयायी त्याला आपल्या खांद्यांचा आधार देऊन बाहेर घेऊन आले. त्याने आपल्या अनुयायांकडून सर्व हकीकत ऐकून घेतली व अस्वलाकडे खोल नजरेने पाहून म्हणाला—"पुजारी काय वाटेल ते करील. मी या अस्वलाला घेऊन जाऊन माझी मुलगी नागमल्ली हिच्याकडे ठेवतो. नागमल्लीच्या हातातली बरछी पाहून हे अस्वल खरे काय ते बोलेल. नंतर आपल्या अनुयायांकडे वळून तो म्हणाला—"आपण सर्वांनी सावध राहले पाहिजे. तो पुजारी कुत्रा जंगलात फिरत असल्यास आश्चर्य नाही. आपल्या सर्व नाग अनुयायांना सावध करा. त्या दुष्ट पुजाऱ्याला पकडले पाहिजे."

लट्ठूसिहाचे अनुयायी त्या अस्वलाला धरून तेथून निघून गेले. तेव्हां जिवाजीने मोठ्या प्रेमाने लट्ठूसिहाची पाठ थोपटून म्हटले—"बरे तर लट्ठूसिंह! आम्ही जातों





आपल्या गावी. त्या दुष्ट पुजाऱ्याने आपल्या परस्परांमध्ये फुकटाची एक भिंत उभी केली होती. आता हे सर्व आपण विसरू या. तुझ्या जखमा लवकर भरून येतील, याची मला खात्री आहे. माझ्या मुलाने घाईघाईत जे केले त्याबद्दल मला वाईट वाटते."

जिवाजीचे ते शेवटचे वाक्य ऐकून लट्ठूसिंह जोराने हसला व म्हणाला– "तरुण वयात घाई केली नाही तर उतार वयात करतो का कोणी? मी देखील त्याच्या वयाचा असताना आपल्या सासऱ्याच्या बाबतीत घाईच केली होती की! माझी पोरगी नागमल्लीकडे पहा, तिच्या समोर हा पोर थोडा नरमच वाटतो मला तरी. तुम्ही सर्वांनी आज रात्री माझ्या गावी मेजवानीला हजर राहाले पाहिजे. तोपर्यंत त्या पुजारी कुत्र्याचा शोध सुद्धा कदाचित लागेल."

लट्ठूसिंहाचा सत्कार स्वीकार करणे बरोबर होईल की नाही हे विचारण्याच्या हेतूनेच जणुकाही जिवाजीने आपल्या मुलाकडे व विक्रमकेसरीकडे पाहिले. ते दोघे काही बोलले नाहीत. पण त्यांची नजर लट्ठूसिंहावर खिळून होती. त्यांना लट्ठूसिंहाचा यात काही डाव तर नसेल अशी शंका वाटत होती.


जिवाजी काय उत्तर देतो हे पाहण्यासाठीच की काय लट्ठूसिंह म्हणाला– "एका जातीच्या नायकाने जेवायला बोलावणे दिले व दुसऱ्या जातीचा नायकाने त्याला नकार दिला ही गोष्ट माझ्या उभ्या आयुष्यात मी कधी पाहिली नाही. मी कधी ऐकली पण नाही."

"ठीक, लट्ठूसिंह! बरे तर आम्ही सर्वच येऊ शकणार नाही. मी, शिखीमुख, विक्रमकेसरी व माझे चारपाच अनुयायी एवढे येऊ. बाकी लोकांनी काळोख पडण्यापूर्वी आमच्या गावी पोचले पाहिजे. कारण तो पुजारी आम्ही सर्व इकडे गुंतलो की तिकडे हल्ला करणार नाही कशावरून?" जिवाजी म्हणाला.

"बरोबर आहे, तुझे म्हणणे, जिवाजी! त्या दुष्टाची हाडे मोडल्याशिवाय माझ्या मनाचे समाधान होणार नाही. बरे तर, निघू या." लट्ठूसिंह म्हणाला.

जिवाजीने आपल्या अनुयायांपैकी चार पांच जणांना मागे रहायला सांगितले आणि इतर सर्वांना शबरवस्तीत जाऊन रात्रभर सावध रहायला सांगून पाठविले. नंतर लट्ठूसिंहाच्या अनुयायांनी आपल्या नायकासाठी एक डोली तयार केली व तिच्यात त्याला बसवून डोली उचलून आपल्या गावाकडे निघाले. जिवाजी, शिखीमुख, विक्रमकेसरी व इतर शबर त्यांच्या बरोबर पाठोपाठ चालू लागले.

समोर एक तास चालत राहाल्यानंतर ते नागलोकांच्या गावात आले. गावाच्या मध्यभागी लट्ठूसिंहाच्या घरासमोर वस्तीतले लोक जमा होऊन हसत खिदळत असलेले दिसले. जिवाजीला वाटले की बहुतेक त्यांनी पुजाऱ्याला धरून आणले असावे. परंतु तेथे गेल्यावर त्याला लट्ठू-



सिंहाची मुलगी नागमल्ली अस्वलाकडून पुष्कळ गमती जमतीचे खेळ करवीत असलेली दिसली.

जिवाजीने चकित होऊन लट्ठूसिंहाला विचारले–"इतक्या लवकर तुझ्या मुलीने या जंगली जनावराला ताळ्यावर आणून माकडासारखे नाचवायला कशी काय सुरवात केली बुवा?"

"आमच्या नागलोकात "धाडस्च मोठे वैभव आहे" अशी एक म्हण आहे. माझी ही पोरगी साहस दाखविण्यात माझी बरोबरी करते. तुझा मुलगा हिची बरोबरी करू शकेल की नाही, एवढीच शंका

मला वाटते. मी म्हटले त्याचा राग नको मानूस जिवाजी बरं का!" लट्ठूसिंह प्रेमाने आपल्या मुलीकडे पहात म्हणाला.

नागमल्लीने बापाला पाहताच अस्वलाच्या गळयातली दोरी फेकून दिली व आपल्या बापाला जाऊन मिठी मारून म्हणाली–"बाबा! तुम्हांला चालता येत नाही ना? कोणी म्हणाले, तसे जास्त लागले नाही ना?"

"तसे जास्त लागले नाही, मुली! पण डाव्या पायाला थोडे..." असे म्हणत हसत शिखीमुखकडे बोट दाखवून लट्ठूसिंह म्हणाला–"या वीराला डोलीवर चढवणारा हा वाघ कोण आहे, माहीत आहे का? याचे नाव शिखीमुख! दिसायला भोळा गरीब दिसतो, पण आहे धाडसी, काय पण हिंमत! वा:!"


नागमल्लीने शिखीमुखकडे पाहिले. क्षणार्धात तिच्या डोळ्यात आलेले पाणी वाळून गेले. रागाने तिचे डोळे लाल झाले. खालच्या ओठावर वरचे दांत गेले. नाकपुड्या फुगीर दिसू लागल्या. ती काही बोलणार, पण लगेच तिने तोंड फिरवले.

विक्रमकेसरी हे सर्व लक्ष देऊन पहात होता. शिखीमुखच्या कानात म्हणाला– "लट्ठूसिंहाने एकदम जेवण देण्याचे ठरविले, त्याचा गूढ अर्थ काय असावा याचा आपण विचार करीत होतो. फार तर तो विष घालण्याच्या विचारात असेल. परंतु त्याची पोरगी फणफणलेली दिसते आहे. ती सूड घेण्याचा विचार करीत असावी थोडा संभाळून रहा."

शिखीमुख काही बोलणार इतक्यात मोकळे सुटलेले अस्वल गुरगुरत समोर जो दिसला त्याला आपला पंजा मारून खाली पाडू लागले. नागमल्ली व शिखीमुख "दूर व्हा, दूर व्हा!" म्हणत अस्वलाच्या मागे धावले.

(पुढील गोष्ट पुढील अंकी)





चोरटे सोने

विक्रमार्कने आपला हट्ट सोडला नाही. तो पुन्हा झाडाजवळ गेला आणि प्रेत खांद्यावर काढून घेऊन स्मशानाच्या दिशेने मौन पणे चालू लागला. तेव्हां प्रेतात बसलेला वेताळ त्याला म्हणाला–"राजा! तुझा हा सर्व यत्न चांगला असू शकेल. परंतु सत्प्रयत्नांचा परिणाम वाईट होण्याची शक्यता आहे. या गोष्टीस एक उदाहरण म्हणून मी तुला सा.यक्रीची गोष्ट सांगतो." असे सांगून वेताळ गोष्ट सांगू लागला.

फार पूर्वी सप्तपुर नावाच्या गावी शतकंठ नावाचा राजा राज्य करीत असे. ते राज्य तसे वैभवशाली नव्हते. अर्थातच

राजा दखोल बताचीं श्रीमत

प्रजा पण गरीबच होती. म्हणुन 'राजा आपल्या ऐपतीप्रमाणे प्रजेच्या सुखसोयी भागवीत असे. प्रजा पण त्याबद्दल आपल्या राजाची स्तुती करी.

वेताळाच्या गोष्टी

 Fullscreen  127     28 / 80


सप्तपुर राज्यात तशी मोठी व्यापाराची मोठी पेठ नव्हती की व्यापार पण भरभराटीचा नव्हता. तरी काही साहसी व्यापाऱ्यांनी त्या गावी आपल्या पेढ्या काढल्या व समुद्रापलीकडे दूरवर व्यापार करून पुष्कळ धन मिळविले. परंतु त्यांनी मिळालेले सोने राजाच्या दृष्टीस पडू नये असे गुप्तपणे ठेवले. कोट्यावधी रुपयांची प्राप्ती राजाला झाली असती ती होऊ शकली नाही. म्हणून राजाने सर्व व्यापाऱ्यांना, त्यांच्याजवळ जे धन आहे त्याची यादी करून पाठविण्यास कळविले. यादी पेक्षा जास्त धन त्याच्याकडे निघाल्यास ते जप्त केले जाईल असे पण राजाने जाहीर केले.

व्यापाऱ्यांनी त्यांच्याकडे जे धन होते त्याची यादी तयार करून राजाकडे पाठविली. परंतु त्या यादीत उल्लेख करण्यायोग्य गोष्टीच त्यांनी वगळल्या म्हणून राजाने त्यांना विचारले—"तुमचा व्यापार समुद्रापलीकडच्या देशांशी होतो आणि तुम्हांला नफा काहीच होत नाही वाटते?"

"महाराज! नफा होतो ही गोष्ट खोटी असे नाही आम्ही म्हणत. परंतु तो नफा काय कामाचा? एक जहाज बुडाले की जो नफा पूर्वी मिळाला असतो त्याच्या दामदुप्पट तोटा सोसावा लागतो. दर्यावर्दी चाचेगिरी करणारे जहाजे लुटतात, खलाशी बंडे करतात. कधी कधी इतकी मंदी येते की तोटा सोसून माल विकावा लागतो. पण हे सर्व कष्ट कोणा जवळ बोलणार?" व्यापाऱ्यांनी उत्तर दिले.

व्यापारी जे म्हणाले ते सर्व खोटे आहे, असे राजाला वाटले. त्यांनी लपवून ठेवलेले सोने बाहेर यावे म्हणून राजाने पुष्कळ प्रयत्न केले, पण ते सर्व फोल ठरले.

सप्तपूर गावी सात्यकी नावाचा एक हुशार नागरिक रहात असे. त्याची घरची स्थिति बेताचीच होती. परंतु तो फार चतुर होता. व्यापाऱ्यांनी धन लपविले आहे व राजाने सर्व प्रयत्न करून हात टेकले हे सर्व तो पहात होता. राजाला वाटे तसेच सात्यकीला वाटे की व्यापाऱ्यांनी आपले गुप्त धन राजाला किंवा इतर कोणाला ही कळू नये अशा तऱ्हेने कोठे तरी दडवून ठेवले आहे. म्हणून सात्यकीने एक सामान्य लहान व्यापाऱ्याचे सोंग केले आणि मोठ्या व्यापाऱ्याची लहानमोठी सर्व कामे करून देऊ लागला. हळूहळू सर्व व्यापाऱ्यांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास बसला. नंतर त्यांच्या गुप्त गोष्टी व ते आपसात बोलताना जे खुणेचे शब्द







वापरत त्यांचा अर्थ त्याला चांगला कळू लागला.

नंतर सात्यकी प्रत्येक व्यापाऱ्याकडे किती व कोठे धन गुप्तपणे पुरून ठेवलेले आहे हे पाहून घेऊ लागला. पुढे काही दिवसांनी व्यापाऱ्यांनी इतके काळजी पूर्वक लपवून ठेवलेले सोने नाहीसे होऊ लागले. ते सोने राजाला कळू नये ह्या हेतूने पुरून ठेवले असल्या कारणाने चोरी झाल्याची फिर्याद राजाकडे घेऊन जाणे व्यापाऱ्यांना शक्य नव्हते.

सात्यकीने चोरून नेलेले सोने स्वत:जवळ ठेवले नाही, तो वेष पालटून गरिबाच्या घरात खिडकीतून टाकी. हळूहळू गरिबांच्या घरी देखील सोने झाले व ते आले कसे हे रहस्य कोणाला कळेना. असे बरेच दिवस चालू होते.

राजाच्या कानावर ही गोष्ट गेली. राजाने ज्याच्या ज्याच्याकडे सोने सापडले त्यांना धरून आणायला आपल्या शिपायांना पाठविले. प्रत्येकाने सोने कोठून व कसे आले, हे त्यांना माहीत नसल्याचे सांगितले.


व्यापाऱ्यांनी पुरून ठेवलेले सोने कोणी-तरी चोरून नेतो व गरिबांना वाटून टाकतो हे राजाने ओळखले. पुरून ठेवलेले सोने बाहेर काढणे कठीण होते, पण ते प्रजेला वाटणाऱ्याला पकडणे कठीण नव्हते. म्हणून राजाच्या शिपायांनी सात्यकीला पकडले.


चोरीच्या आरोपावर सात्यकीला राजाने चवकशी करून तुरुंगात टाकले. त्याला पकडून तुरुंगात टाकल्यानंतर चोरी व्हायची बंद झाली व सोने वाटण्याचे काम पण बंद पडलेले दिसले. यावरून सात्यकी एकटाच चोर होता हे पण स्पष्ट झाले.

येथवर गोष्ट सांगून वेताळ म्हणाला– "शतकंठ राजाने सात्यकीचा जाहीर सन्मान न करता त्याला सामान्य चोरा-सारखी शिक्षा कां केली? राजा स्वत:च चोरटे सोने बाहेर काढू शकला नाही, ते चातुर्याने बाहेर काढून गोरगरिबांना व प्रजेला वाटणाऱ्या सात्यकीला एक सामान्य आरोपी मानून शिक्षा करण्याचे काय कारण असू शकेल, हे नाही कळले मला. या प्रश्नांचे उत्तर माहीत असून तू दिले नाहीस तर त्याची शिक्षा तुला माहीतच आहे, तुझ्या डोक्याची शंभर छकले होऊन तुझ्याच पायावर लोळू लागतील."

राजा विक्रमार्क म्हणाला–"सात्यकीचा अपराध, त्याने सोने चोरले हा नव्हेच. त्याचा अपराध त्याने ते सोने राजा-कडे जमा न करता प्रजेला स्वखुशीने वाटले हा होय. प्रजेच्या योगक्षेमाची जबाबदारी राजावर असते. तो अधिकार सात्यकीने आपल्या हाती घेतला. नंतर व्यापाऱ्यांना आपल्या बाजूला करून घेणे पण राजाला साहजिकच जास्त आवश्यक वाटले. कारण ते अनुकूल असतील तर व्यापाराची भरभराट होईल व करवाढ करून प्रजेला सुखी करणे शक्य होईल. त्यापूर्वी व्यापारी राजाला कळविल्याशिवाय सोने चोरून ठेवीत होते. सोने वाटून टाकण्यापेक्षा जमा करून राज्याच्या भर-भराटी साठी त्याचा उपयोग करणे जास्त आवश्यक होते. सात्यकीला सोने चोरून आणणे फक्त माहीत होते. पण व्यापाऱ्यांना सोने कसे मिळवावे हे कळत होते. म्हणून त्याना स्वत:कडे वळवून घेणे जास्त फायद्याचे होते. काही व्यापाऱ्यांनी पुन्हा धन लपवून ठेवण्याचा विचार केला तर सात्यकीला तुरुंगातून सुटका देऊन त्यांचा चोरटा व्यापार उघडकीला आणणे राजाच्या हातात होते. या सर्व गोष्टीचा विचार करूनच राजाने सात्यकीला शिक्षा केली होती."

अशा तऱ्हेने राजाचे मौन भंग होताच वेताळ प्रेतासह अदृश्य झाला व झाडाला जाऊन लोंबकळू लागला. (कल्पित)





भुतांचा दरबार

जपान देशातील लोक आपल्या प्राचीन काळातील वीरांचे पोवाडे गात असत. त्या वीर गाथात एका शूर जपान्याची गाथा होती. शत्रूशी समुद्रावर युद्ध करीत असता त्याला वीरगती मिळाली होती. त्यावेळी त्याच्या बायकोने शत्रूच्या हाती कैद झाल्यास ते अपमानस्पद होईल असा विचार करून आपल्या लहान मुलाला कडेवर घेऊन समुद्रात उडी मारून जीव दिला.

होल्बी नांवाचा एक आंधळा भिकारी आपल्या तुणतुण्यावर असेच पोवाडे गाई. त्याला त्या धंद्यावर पोटा पाण्यापुरेसे पैसे मिळत. जे थोडे जास्त पैसे मिळत ते लपवून ठेवायला त्याला घरदार काही नव्हते. म्हणून तो एका बौद्ध मठाच्या अधिकाऱ्याच्या कृपेने मठाच्या ओसरीत त्याच्याकडे जे काही सामान होते ते सर्व घेऊन रहात असे.

एक दिवशी संध्याकाळी सूर्यास्ताच्या सुमारास मठात कोणी नव्हते. सगळीकडे शुकशुकाट होती. होल्बी ओसरीच्या खांबाला टेकून गुणगुणल्यासारखा गाणे म्हणू लागला. त्या वेळी अचानक कोणी तरी आला व होल्बीचा हात धरून म्हणाला—"होल्बी! तू फार छान गातोस असे आमच्या महाराजांना कळले आहे. त्यांनी तुला बोलावून आणण्यासाठी मला पाठविले आहे. चल जाऊ या."


राजाने बोलाविले आहे तर जाणे भाग आहे असा विचार करून होल्बी त्या मनुष्याचा हात धरून चालू लागला. आता ते दरबारात पोचले असल्याचे होल्बीने ओळखले. कारण त्याला स्त्रियांच्या कपड्यांचा फरफर असा आवाज ऐकू आला व त्याच्या पाठोपाठ उच्चकुळातल्या स्त्रिया लावतात त्या अत्तराचा वास पण आला.

होल्बीला एका उच्चासनावर बसविण्यात आले. 'समुद्रावर झालेल्या युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या वीर पुरुषाची गाथा म्हणून' असा एका स्त्री कंठातून आलेला हुकूम होल्बीला ऐकू आला. त्याप्रमाणे आपल्या खड्या आवाजात होल्बी आवेशाने पोवाडा म्हणू लागला. त्याचा तो पोवाडा ऐकून गायला सांगणारी स्त्री रडत असल्याचे त्याला ऐकूं आले. त्या पोवाड्यातल्या वीर पुरुषाची बायकोच ती स्त्री होती, ही गोष्ट होल्बीला माहीत नव्हती.

होल्बीला हात धरून घेऊन येणारा त्याला पुन्हा बौद्ध विहारात पोचता करून म्हणाला—"असाच एक आठवडाभर रोज येऊन गाणे म्हटलेस तर आमचे महाराज तुला मोठे इनाम देणार आहेत." असे सांगून तो मनुष्य निघून गेला.

असेच तीन चार दिवस होल्बी रोज दरबारात जाऊन आला. रात्री तो ओसरीत नसतो हे बौद्ध विहाराच्या अधिकाऱ्याला कळले. हा आंधळा रात्रीच्या वेळी कोठे बरे जात असेल, जरा बरोबर जाऊन पाहून तर या असे सांगून त्याने त्या कामावर आपल्या दोघां नोकरांना नेमले.


संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास होल्बी स्वतःच उठून जोरजोराने जात



असलेला पाहून नोकरांना आश्चर्य वाटले. तो कोणाचा तरी हात धरून चालल्यासारखा दिसे, पण हात धरून नेणाराव्यक्ति मात्र दिसत नव्हता. ते होल्बीच्या पाठोपाठ स्मशानात गेले. तेथे होल्बी एका उंच दगडावर बसून आपल्या तुणतुण्याच्या सुरात गाणे म्हणू लागला. ते पाहून नोकर होल्बीच्या जवळ गेले. दोघांनी त्याचा एकेक हात धरला व त्याला बौद्ध विहाराच्या अधिकाऱ्यासमोर आणून उभे केले. होल्बीने चार पांच दिवस जे घडले ते जसेच्या, तसे सांगितले. ते सर्व ऐकून अधिकाऱ्याला जुना इतिहास आठवला. प्राचीन काळात जी युद्धे झाली ती युद्धभूमी बौद्ध विहाराच्या शेजारीच होती. त्या श्मशानात राहणारे त्या वीर पुरुषांचे प्रेतात्मे आपली वीर गाथा रोज ऐकायला म्हणून होल्बीला बोलावून नेत असणार. असा विचारकरून विहाराचा अधिकारी म्हणाला—"होल्बी, तुला रोज बोलावून नेणारी भुते आहेत. त्यांच्याशी तू मैत्री वाढविलीस तर ते तुझा सर्वनाश करतील." ते ऐकून होल्बी घाबरला.

अधिकाऱ्याने होल्बीला धीर दिला व म्हणाला—"या खेपेस तो मनुष्य तुला घेऊन जायला आला की तू त्याच्याशी बोलूच नकोस." असे सांगून त्याच्या सर्व अंगावर त्याने काही तरी मंत्र लिहून ठेवला.

पण तो त्याच्या कानावर मंत्राक्षर लिहायला विसरला. म्हणून होल्बीला घेऊन जाण्यासाठी जेव्हां भूत आले तेव्हां त्याला होल्बीच्या कानाशिवाय दुसरे काही दिसले नाही. म्हणून त्या भुताने त्याचा कान धरून त्याला जोराने ओढले. तेव्हां त्या भुताच्या हातात होल्बीचा फक्त कानच आला. कान तूटल्यावर कळा येऊ लागल्या. पण तो तेथून उठला नाही. तो स्वत:शीच एवढे पुटपुटला—"इतके दिवस त्या भुतांसाठी गाणे म्हटले त्याचे हेच बक्षिस मिळाले."





हितोपदेश

कांभोज देशाचा राजा जयसिद्धी याला विजय नावाचा एक मुलगा होता. तो एक शूर, पराक्रमी व साहसी तरुण होता. त्याला युद्धविद्या पण उत्तम अवगत होती. युद्धाचे डावपेच, व्यूहरचना इत्यादीमध्ये त्याचा हात धरणारा जवळपास कोणी नव्हता.

विजयच्या मनात साहसाची कामे करण्याची मोठी महत्वाकांक्षा होती. परंतु त्याच्या बरोबर नित्य अंगरक्षक असत व ते त्याला काही करू देत नसत.

युवराजाने आपल्या राज्याभिषेकाच्या पूर्वी सर्व राज्यभर एकदा पर्यटन करून यावे अशी इच्छा वडिलांजवळ व्यक्त केली व राजाने त्याला आनंदाने परवानगी दिली. म्हणाला—"होय! तू होणारा राजा, राज्यात कोठे काय आहे हे स्वत: पाहून येणेच बरे. प्रजेची सुखदु:खे काय आहेत ती तू पाहून घ्यावीस हे भावी राजाला शोभेसेच आहे. तू पर्यटन करीत असता मुख्य करून तीन गोष्टी लक्षात ठेव. पहिली गोष्ट म्हणजे थोडा वेळ देखील तू एकटा कोठे जाऊ नकोस दुसरी गोष्ट, तू विश्रांती घेण्यासाठी कोठे थांबला तर पुढे जाण्यापूर्वी एकदा आजूबाजूला पाहाल्याशिवाय पुढे जाऊ नकोस. तिसरी गोष्ट, आपल्या रानात अस्वले पुष्कळ आहेत. चुकूनदेखील त्यांची खोड काढू नकोस. जमिनीवर स्वस्थ पडून असलेल्याच्या वाटेला अस्वल जात नाही. म्हणून अस्वल आढळलेच तरी आपले शौर्य त्याच्यासमोर दाखविण्या ऐवजी जमिनीवर मेल्यासारखा स्वस्थ पडून रहा."

विजयने राज्यभर एकटयानेच पर्यटन करण्याचा विचार केला. परंतु राजाने तशी परवानगी दिली नाही व त्याच्या बरोबर दोघां हुशार योद्धयांना पाठविले.



अरण्यातून जाण्याची गरज नाही. आपण बाहेरून पलीकडे जाऊ या."


ते ऐकून विजयच्या सर्वांगाचा जणुकाही भडका उडाला. परंतु स्वतःचा राग आवरून व थोडेसे चातुर्य दाखवून तो दोघा अंगरक्षकांना म्हणाला–"जंगलाच्या उजव्या बाजूने गेल्यास बरे होईल की डाव्याबाजूने हे तुम्ही दोघे थोडे दूर जाऊन पाहून या. तुम्ही दोघे येईपर्यंत मी तुमची वाट पाहातो."

[redacted]

कित्येक वाघांना ठार करणे डाव्या हाताचा खेळ आहे. पुरुषासारखा पुरुष मी आणि बायकासारखी सोबत मला कशाला? युवराज विचार करू लागला.

ज्या ठिकाणी बसून त्याने काही वेळ विश्राती घेतली तेथून उठून तो पुढे निघाला. थोडे अंतर चालून गेल्यावर त्याला अरण्यात कोठून तरी एक विचित्र आवाज ऐकू आला. असेल एखादे जंगली जनावर, असा विचार मनात येताच त्याचा हात एकदम तलवारीच्या मुठीवर गेला. पण तलवारच नव्हती. ज्या ठिकाणी विश्रांती घेण्यासाठी तो थांबला होता तेथे त्याने तलवार बाजूला काढून ठेवली होती व निघताना तो तेथेच विसरून आला होता.

इतक्यात समोरून गुरगुरत एकदोन अस्वले येत असलेली त्याला दिसली. दोन अस्वले होती. हातात तलवार असती तरी दोन्ही अस्वलांशी दोन हात करणे कठिण होते. अस्वलासमोर आपले शौर्य व बळ दाखवू नकोस, मेल्यासारखा जमिनीवर पडून रहा, असे वडिलांनी सांगितले होते ते त्याला आठवले. त्याप्रमाणे लगेच तो जमिनीवर निश्चळ उताणा पडून राहाला. अस्वलांनी त्याच्याकडे ढुंकून सुद्धा पाहिले नाही आणि पुढे निघून गेली.



विजय उठला व त्याने जेथे वाघाला ठार केल्यावर विश्रांती घेतली होती तेथे आला. तलवार तेथेच होती. ती घेऊन व पुढे जाण्याचा विचार सोडून देऊन परत फिरला व जेथे अंगरक्षकांना भेटण्यासाठी तो वाट पहात बसणार होता तेथें येऊन बसला. दोघे अंगरक्षक युवराज दिसत नाही असे पाहून त्याचा शोध काढीत हिंडत होते.

ऐन दुपारची वेळ होते. कडक ऊन पडले होते. विजयला भूक लागली होती व तहान पण लागली होती. जवळच त्याला एक बाग दिसली व बागेत एक सरोवर दिसले. सरोवर दिसताच त्यात उडी मारून थोडे से डुंबावे असे त्याला वाटले. त्याप्रमाणे त्याने कपडे काढून काठावर ठेवले व पाण्यात उडी मारून पोहू लागला. स्नान करून काठावर येऊन पाहातो तर त्याचे कपडे त्याला दिसे नासे झाले. त्याने चारी बाजूला एक नजर फिरवून पाहिले. वर पाहिले झाडावर माकडे होती. त्यांच्या जवळ त्याचे कपडे होते. माकडे ते कपडे उलट सुलट करून पहात होती. मधून मधून दातांनी कुरतडीत पण होती.

मी एकटा नसतो तर असे झाले नसते. बाबांनी सांगितले होते ते बरोबर होते. अंगरक्षक असते तर माकडांनी कपड्यांना हात लावला नसता.

काय करावे हे त्याला सुचेना. त्याने माकडांना दगड मारायला सुरवात केली. माकडांनी रागाच्या भरात त्याचे कपडे फेकले.

कपडे मिळाले, परंतु फाटून गेलेले होते. ते फाटके कपडेच त्याला घालावे लागले.

इतक्यात त्याचे अंगरक्षक पण त्याला शोधत तेथे आले.

तेव्हांपासून विजयने, वडिलांनी, ज्या गोष्टींची खुणगांठ बांधून घ्यायला त्याला सांगितली होती ती त्याने बांधून घेतली. त्यानंतर त्याचे पर्यटन निर्विघ्न पार पडले.






हुंडा

फार पूर्वी कांचीपुरम येथे विश्वगुप्त नावाचा एक वैश्य रहात असे. त्याच्या बायकोचे नाव गुणवती असे होते. त्यांना चार मुले होती. कधीकाळी त्या वैश्य कुटुंबाची गणना श्रीमंत व्यापाऱ्यात होत असे. परंतु तूर्त त्यांची आर्थिक स्थिति चांगली नव्हती. म्हणून चौघां मुलांना स्वतःच्या व कुटुंबाच्या पोटापाण्यासाठी मेहनत करावी लागे. मोठ्या मुलाचे नाव रामगुप्त होते. चौघां मुलांत तोच एक हुशार होता. बाकी तिघे निरुपयोगी होते.

मुलांच्या लहानपणीच विश्वगुप्त मरण पावला. मुलांची सर्व जबाबदारी गुणवती-वरच येऊन पडली. एक योग्य सून पाहून तिने रामगुप्ताचा संसार थाटून दिला. कारण पुढे नाव काढील तर तो एकटाच होता. संसाराचा गाडा चालविण्याची योग्यता होती ती पण त्या एकट्यातच होती.

पुढे काही दिवसांनी रामगुप्ताला एक मुलगी झाली. तिचे नाव वसुमती असे ठेवण्यात आले. वसुमती जन्मली तेव्हां पासूनच गुणवतीने अंथरूण धरले. औषध पाणी पुष्कळ केले. पण गुण मुळीच पडला नाही. अंतकाळ जवळ येऊन ठेपला असल्याचे ओळखून तिने आपल्या मोठ्या मुलाला जवळ बोलाविले. ती गोष्ट राम-गुप्ताच्या धाकट्या भावंडांना कळली. आईने कोठे तरी पैसे गुप्तपणे ठेवले आहेत व ती गोष्ट भावाला सांगणार असेल. म्हणून तिघे भाऊ जवळच भिंतीला कान लावून ऐकत उभे राहाले.

रामगुप्ताला खाटेवर बसायला सांगून गुणवती म्हणाली—"मुला! बाळा! आपल्या देव्हाऱ्याच्या खाली तांब्याच्या लोट्यांत सोन्याची काही नाणी ठेवलेली आहेत. पण त्यांना हात लावता कामा नये.



यापूर्वी आपल्या कुळातील एका दोघांनी हात लावण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्यावर मोठे प्रसंग ओढवले. म्हणून पुढच्या पिढीला या गोष्टीची जाणीव आगाऊ करून देण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे."

"होय आई! पण तेथे त्या लोटया पुरून कोणी ठेवल्या? तुला माहीत आहे का?" रामगुप्तने विचारले–"आपल्या कुळात पूर्वी कोणीतरी बाईने त्या मरण येण्यापूर्वी पुरून ठेवल्या व 'मी पुन्हा जन्म घेऊन ते गुप्त धन घेईन. तोपर्यंत कोणी हात लावू नये. हात लावल्यास तत्काळ त्यांना मरण येईल', असे सांगितले

आईने जे सांगितले ते सर्व रामगुप्ताच्या भावंडांनी ऐकले व सरळ देव्हाऱ्या जवळ गेले. देव्हारा उचलून बाजूला ठेवला व जमीन खणून पाहिली, तेव्हां त्यांना पाच तांब्याच्या लोटया दिसल्या. प्रत्येक तांब्यात सोन्याची नाणी भरलेली होती व तांब्यांच्या तोंडाला सोन्याची तार बांधलेली होती. रामगुप्ताला ही गोष्ट कळली तेव्हां धावत जाऊन आपल्या धाकटया भावंडांना समजावून सांगितले. पण कोणी ऐकले नाही. त्या तिघां भावंडात जो सर्वात मोठा होता त्याने लोटी धरून उचलण्याचा यत्न केला, पण ती जागची हालत नव्हती. म्हणून त्याने खूप जोर लावला. पण ती लोटी बाहेर तर आलीच नाही, उलट तो धक्का लागल्या सारखा खाली पडला व भडाभडा रक्त ओकला. ते पाहून इतर दोघे घाबरून पळून गेले. तेव्हां मोठया भावाने खड्डा बुजवला व जमीन सारखी करून पुन्हा देव्हारा पूर्वी सारखा ठेवून दिला.

कित्येक वर्षे लोटली. वसुमती लहानाची मोठी झाली. वरशोधनाची काळजी लागली रामगुप्ताला. योग्य वर पाहिजे म्हणजे हुंडापण तसाच द्यावा लागणार. पण तेवढे धन कोठून येणार?


एकदा वसुमती पाणी आणायला नदीवर गेली. एक तरुण युवक घोडयावर बसून तिकडे येत असतांना तिला दिसला. त्याला पाहून ती मनातल्या मनात म्हणाली– "किती सुंदर आहे!"

त्याच वेळी त्या तरुणाने पण तिला पाहिले व मनातल्या मनात म्हणाला– "किती सुंदर आहे!"

त्या तरुण युवकाचे नाव भानुगुप्त, व त्याच्या वडिलांचे नाव प्रसन्न गुप्त असे होते. कांचीपुरमच्या श्रीमंत घराण्यापैकी त्याचे एक घर होते. त्याच्याकडे जेवढे धन व वैभव होते, तितकाच तो लोभी पण होता. त्याच्या मुलाला चांगला मोठा हुंडा मिळाल्याशिवाय त्याचे लग्न करायचे नाही असे तो सर्वांना सांगत असे.

दोघांनी प्रथम परस्परांना पाहिले तेव्हां पासून कित्येकदां त्यांची नदीवर भेट झाली व त्यांचे परस्परांवर प्रेम जडले. "मी लग्न करीन तर तुझ्याशीच." असे भानुगुप्ताने वसुमतीला उघड सांगून पण टाकले.

त्या दिवशी वसुमतीने घरी गेल्यावर ती गोष्ट आपल्या वडिलांना जाऊन सांगितली.



तेव्हां रामगुप्त प्रसन्न गुप्तला जाऊन भेटला व म्हणाला–"माझ्या मुलीला आपली सून करून घ्या. दोघांचा जोडा छान शोभेल, पहा."

"माझ्या मुलाला हजार पुतळ्यांचे सोने हुंडा म्हणून देणार असाल तर लग्नाच्या गोष्टी बोलायला मी तयार आहे. नाही तर ती गोष्ट पुन्हा कधी बोलायला यायची गरज नाही." प्रसन्न गुप्त म्हणाला.

रामगुप्ताने घरी आल्यावर ते सर्व मुलीला सांगितले.

रात्री झोपल्यावर वसुमतीला स्वप्नात सोन्याच्या पुतळ्यांनी भरलेल्या तांब्याच्या लोटया त्या देव्हाऱ्याच्या खाली असल्याचे

दिसले. परंतु त्या स्वप्नातल्या गोष्टीकडे तिने दुर्लक्ष केले. परंतु ते स्वप्न दररोज दिसू लागले. म्हणून उजाडल्यावर एकदा ती आपल्या वडिलांना म्हणाली— "बाबा! मला रोज रात्री स्वप्नात देव्हाऱ्याच्या खाली पुरलेल्या, सोन्याच्या पुतळ्या भरलेल्या पांच त्यांब्याच्या लोट्या दिसतात. मग ते खरे का हो?"

"बापरे! तुला त्या स्वप्नात दिसल्या तशा आहेत ही गोष्ट खरी आहे. परंतु त्या विसरून जा माझे आई! त्यांना जो हात लावतो त्याचा सर्वनाश होतो." बाप मुलीला म्हणाला. नंतर त्याने, मुलीच्या आजीने अंतकाळी जे सांगितले ते व त्याच्या डोळ्यासमोर धाकटा भाऊ त्या लोट्यांना हात लावताच कसा रक्त ओकला ते सांगितले.

बापाने जे सांगितले त्यावर वसुमतीने बराच वेळ विचार केला व मनातल्या मनात एका गोष्टीचा दृढ निश्चय केला. आपले लग्न भानुगुप्ताशी झाले नाही तर आपले जीवितच नव्हे तर भानुगुप्ताचे जीवित सुद्धा व्यर्थच जाणार. त्यापेक्षा त्या लोट्यांना हात लावून मरण आले तर बरे. कारण त्यात तिचा एकटीचाच जीव जाणार. असा मनाशी विचार करून बाप 'नको नको' म्हणत असता तिने देव्हाऱ्या खालची जमीन खणली व पुरलेल्या त्या पांचही लोट्या सहज बाहेर काढल्या. रामगुप्त ते पाहून चकित झाला.

प्रत्येक लोटीत पांच पांचशे पुतळ्या होत्या. एकूण अडीच हजार पुतळ्या होत्या. तर मग हे सर्व वसुमतीनेच पूर्व जन्मी पुरून ठेवलेले धन असले पाहिजे. रामगुप्ताला आता संशय उरला नाही.

त्याने भानुगुप्ताशी मुलीचे लग्न एक हजार पुतळ्यांचा हुंडा देऊन करून दिले.





विचित्र चढाओढ

अंगदेशाचा युवराज जयदेव धनुर्विद्येत पारंगत होता. त्याच्या बरोबर नेहमी [illegible] व धाजमी होते. जयदेव त्यांना [illegible] जंगलात शिकारीला जाई किंवा [illegible] परस्पर युद्ध विद्येची चढाओढ [illegible]. रात्री सर्व एकत्र बसून जेवत.


एका दिवशी स्वच्छ चांदणे पडले होते. [illegible] जेवायला बसले होते. जयदेवने आपल्या मित्रमंडळींना विचारले—"मी एका सुयोग्य राजकन्येशी विवाहाचा विचार करीत आहे. तुमच्या पाहण्यात किंवा ऐकिवात कोणी सुंदर व सुशील राजकुमारी आहे का?"

कोणीही उत्तर दिले नाही. पण विक्रम नामक एक तरुण युवक म्हणाला—"मणिपूरच्या राजाला दोन मुली आहेत. मोठी मुलगी लीलावती ही युद्धविद्येत निष्णात आहे. नेहमी घोड्यावर स्वारी करून रानात रानटी जनावरांची शिकार करते. डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या लुटेऱ्यांच्या [illegible] बरोबर. दुसरी मुलगी लक्ष्मणा ही फार [illegible] आहे. स्वभावाने सौम्य आहे, सुशील आहे. तीच आपल्याला योग्य राजकन्या ठरू शकेल."

"तर मग तू आजच्या आज मणिपूरला सैन्य घेऊन जा आणि साम, दाम, दंड, भेद सर्व उपाय करून लक्ष्मणेला घेऊन ये." जयदेव म्हणाला.

"मला सैन्याची गरज नाही. फक्त एक शूर तरुण बरोबर असला की पुरे. मणिपूरच्या राजाच्या सरदारांचे शौर्य मला माहीत आहे. तीन वर्षे मी त्याच्या पदरी काम केले आहे." विक्रम म्हणाला.

विक्रम खरोखरच नावासारखाच मोठा पराक्रमी होता. जयदेवच्या साथी मित्रा



आहे ना? माझ्या दरबारी पुन्हा नोकरी करायला आला आहेस वाटते?"

"महाराज, आज मी आपल्या दरबारी नोकरी मागण्यासाठी आलो नाही. आमचे युवराज जयदेव यांच्या मनात आपली मुलगी लक्षणा हिच्याशी लग्न करावे असे आहे. याच कामासाठी त्यांनी मला आपल्या दरबारी पाठविले आहे. महाराजांनी राजकन्येला माझ्या बरोबर पाठविण्याची व्यवस्था करावी." विक्रम विनयपूर्वक म्हणाला.

ते ऐकून राजाला मनस्वी राग आला. म्हणाला–"चोर, नमकहराम! तीन वर्षे तू माझे मीठ खाल्लेस आणि आज तू हे बोलतो आहेस? पकडा या दुष्टाला! स्वामिद्रोही! काळ कोठडीत टाका याला. उपाशी मरू दे त्याला तेथे." क्षणभर दरबारात कोणी काही बोलले नाही की हालचाल केली नाही. सर्व दरबारी भयकंपित स्तब्ध जागच्या जागी उभे होते.

विक्रमची गर्जना ऐकून कोणाची पुढे यायची छातीच होईना. त्यांना विक्रमच्या पराक्रमाची पूर्वीपासूनच चांगली कल्पना होती.

मणिपूरच्या राजाला प्रसंग ओळखायला वेळ लागला नाही. त्याचा आवाज एकदम खाली पडला. म्हणाला–"विक्रम! तुझ्या युवराजाची लक्षणाशी विवाह करण्याची इच्छा आहे, एवढेच ना? मी तिला तुझ्या बरोबर पाठवून देतो. तुझ्या पराक्रमाची परीक्षा घेण्याची माझी इच्छा होती." त्या वेळी विक्रमच्या तलवारीचे टोक राजाच्या छातीपासून फक्त एका वितेवर होते.

राजाने म्हटल्याप्रमाणे लक्षणाला पाठविण्याची व्यवस्था केली. ती एका घोड्यावर बसून त्या दोघांच्या बरोबर निघाली.

वाटेत एका जागी संध्याकाळ झाली व काळोख पडू लागला. सर्वांना एका धर्मशाळेत उतरावे लागले. राजकुमारीला मध्ये झोपवून दोघे पाहारा देण्याच्या हेतूने दोन्ही बाजूला तलवार व भाला ठेवून झोपले.

अचानक मध्यरात्रीच्या सुमारास विक्रमची झोप मोडली. घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकून तो दचकून उठून बसला. आवाज जवळ जवळ येत होता. भाला हातात घेऊन



पैकी कोणी त्याची बरोबरी करण्याचे साहस कधी दाखविले नाही. तो म्हणेल ते करील याची खात्री प्रत्येकाला होती. म्हणून जयदेव त्याला म्हणाला–"तर मग तू विभूतीला बरोबर घेऊन मणिपूरला जा आणि काम पुरे करून परत ये."

विभूती विक्रम बरोबर निघाला. विभूती नित्य सावली सारखा विक्रमच्या बरोबर

[illegible] बसून [illegible]

येऊन पोचले [illegible] तलवार [illegible]

[illegible] राजाने आपल्या [illegible] सर्वांना [illegible]

[illegible] सरदाराला ओळखले व प्रेमादर सहित तयार होऊनच पुढे यावे. नाहीतर हातात

विचारले–"कसे काय विक्रम? बरं तलवार फेकून देऊन बाजूला व्हावे." [illegible]



"लागोपाठ तीन वर्षे दररोज मला पाहून ही ओळखले नाहीस वाटते?" बायकी आवाज होता.

विक्रम चकित होऊन म्हणाला–"कोण लीलावतीदेवी! अशा मध्यरात्रीच्या वेळी?"

लीलावती घोड्यावरून खाली उतरून म्हणाली–"माझ्या विवाहापूर्वी तू माझ्या धाकट्या बहिणीचा विवाह करून द्यायला निघाला आहेस? हे धर्मविरुद्ध काम करायला तू तयार कसा काय झालास? माझा विवाह देखील तूच कां नाही कोठे लावून देत?"

"मी वर कोठून आणू?" विक्रमने विचारले.

"तरमग तूच हो लग्नाला तयार! तू यापूर्वी कधी विचारले असतेस तर मी तुझ्याशी केव्हांच लग्न केले असते. तूं कधी विचारले होतेस का? म्हणून मीच विचारते आहे." लीलावती म्हणाली.

याहून माझे मोठे भाग्य ते काय असणार? मी तयार आहे, लीलावतीदेवी."

धर्मशाळेच्या बाहेर आला. कोणीतरी योद्धा हातात भाला घेऊन कवच व शिरस्त्राण धारण करून त्याच्याकडेच येत असलेला त्याला दिसला.

जवळ आल्यावर त्या घोडेस्वाराने घोड्याला थांबविले.

विक्रमने आपल्या भाल्याच्या टोकाने [illegible] शिरस्त्राण [illegible] "कोण–

तू? तुला यमलोकी पाठविण्यापूर्वी मी तुला विक्रम म्हणाला.

[illegible] आहे. माझ्या बरोबर एकट्याने [illegible] करण्याची तुझी हिंमत? मणि- [illegible] एका ही सरदारात एवढी हिंमत [illegible] हे मला माहीत आहे."

उजाडण्याच्या सुमारास दोघ वार लक्षणाला घेऊन जयदेव होता तेथे आले. लक्षणाला पाहून जयदेवला फार आनंद झाला. परंतु मोठ्या बहिणीशी लग्न करून

[illegible] विचार [illegible] द्वंद्वयुद्ध [illegible] पूरच्या [illegible] नाही.

आपल्या पदरी नोकरी करणारा विक्रम आपला साडू होणार व आपली बरोबरी करणार हे शल्य विक्रमच्या मनात राहून गेले. म्हणाला–"तू माझ्या मोठ्या मेहुणीशी लग्न करणार हे नाही मला पसंत. माझ्या मेहुणीचे लग्न माझ्यासारख्या कोणत्या तरी युवराजाशी, निदान राजकुमाराशी व्हावे अशी माझी इच्छा आहे." जयदेव म्हणाला.

जयदेव जे म्हणाला ती गोष्ट विक्रमला झोंबली. तरी स्वतःला आवरून शांतपणे म्हणाला–"मी लीलावतीशी स्वतः लग्नाला तयार झाले नाही. तिनेच माझ्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तिच्या इच्छेप्रमाणे मी लग्नाला तयार झाले, एवढेच."

जयदेवने लीलावतीला कोणत्या तरी युवराजाशी किंवा राजकुमाराशी लग्न करण्यास सांगितले. पण लीलावती म्हणाली–"विक्रमहून कोणी मोठा शूरवीर असेल तर मी त्याच्याशी लग्नाला तयार आहे."

विक्रमने लगेच शौर्याची परीक्षा घेण्यासाठी आवश्यक व्यवस्था केली. शौर्याची परीक्षा कोणत्या गोष्टीत करावयाची हे लीलावतीने सुचविले.

लीलावतीने एक तलवार पुरून ठेवायला सांगितले. नंतर तिने विक्रमला बाणाचे अणकुचीदार टोक काढून बाण त्या तलवारीला मारायला सांगितले. बाण तलवारीला लागला व उभा चिरला गेला. दोन्ही भाग सारखे होते.

नंतर जयदेवच्या मित्रमंडळी पैकी वीरांनी प्रयत्न करून पाहिला. परंतु कोणाला ते साधले नाही. तेव्हां जयदेवला विक्रमशी लीलावतीच्या लग्नाला होकार द्यावा लागला.

विक्रम लीलावती बरोबर मणिपूरला गेला. मणिपूरच्या राजाने त्याला आपला सेनापती नेमले. पुढे राजाने त्यालाच आपला वारस म्हणून नेमले.

